# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.६०५८ ते ६०६०/२०२६

श्रीमती संगिता ए. सावलकर
श्री. अशोक बी. सावलकर (सहयोगी सदस्य)
रेवा सीएचएसएल, ३०४, दत्तनी पार्क बिल्डींग.८
कांदिवली ई, मुंबई-४००१०१.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
आर दक्षिण विभाग, कांदीवली (प) मुंबई- ४०० ०६८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, आर दक्षिण विभाग
कांदीवली (प) मुंबई- ४०० ०६८.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या उपरोक्त अपील अर्जातील त्यांच्या **जोडपत्र अ** च्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आलेला प्रतिसाद व अपिलीय आदेशात नमूद केलेले उल्लेख हे संपूर्णतः दिशाभूल करणारे व खोटे असल्याचे अपिलार्थीनी त्यांच्या लेखी खुलासात व आज मौखिक आदेशात नमूद केले असून तत्कालीन जन माहिती अधिकारी, आर/दक्षिण विभाग कांदिवली, सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने यांनी दिलेला प्रतिसाद हा **माहितीचा अधिकार अधिनियमातील** तरतुदींशी विसंगत असून त्यांच्या इमारतीतील दुरुस्तीबाबत त्यांनी केलेले तक्रार अर्ज तसेच विविध पाठपुरावे, महानगरपालिकेचे प्राधिकरण, सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद नसल्याने संबंधितांविरुद्ध कार्यवाहीची मागणी देखील अपिलार्थी यांच्याकडून केली असून यातील एक **जोडपत्र अ** हा आपले कर्तव्य न बजावणाऱ्या संबंधितांविरुद्ध प्रथम दर्शनी अहवाल (FIR) दाखल करण्यासंदर्भातील आहे.

आज झालेल्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित नसल्याचे आढळून येते. तसेच त्यांच्याकडून कुठलाही खुलासा प्राप्त झालेला नाही. या अनुषंगाने अपिलार्थीनी दिनांक २८ फेब्रुवारी २०२५, १५ जुलै, २०२६ रोजी आयोगास सादर केलेल्या पत्रांची प्रत देखील

जोडली असून यात दिलेला प्रतिसाद हा विहित मुदतीत नसून अपिलीय आदेशात जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेखाशी विसंगत असे उत्तर दिले असल्याचे नमूद करीत या सर्वांविरुद्ध **कलम १९ (८) (ख)** अन्वये नुकसान भरपाई तसेच त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचे व त्यांचे राहते निवासस्थान म्हणजेच फ्लॅट नंबर ३०४, रेवा सहकारी गृहनिर्माण संस्था, दत्तानी पार्क, कांदिवली (पूर्व), मुंबई-४०० ००१ याचे काम पूर्ण करण्यासंदर्भात निर्देश देण्याची विनंती देखील केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राधिकरणातर्फे आज सुनावणीस कोणीही उपस्थित नसल्याचे तसेच अपिलीय अधिकारी यांनी कुठलाही आदेश पारित केला नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत प्रस्तुत तीनही अपील अर्ज अंशतः मंजूर करीत अपिलार्थीच्या **जोडपत्र अ** मधील नमूद माहिती ही तात्काळ व विनामूल्य देण्याचे तसेच त्यांनी केलेल्या तक्रार अर्जात प्रशासकीय पातळीवर प्रचलित नियमानुसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या तत्कालीन माननीय मुख्य सचिव यांच्या दिनांक १८ जानेवारी, २०१३ रोजीच्या परिपत्रकात दिलेल्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचनेसह प्रस्तुत अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहेत. मात्र असे करीत असतानाच अपिलार्थीनी उपायुक्त परिमंडळ-७ यांनी दिनांक ०६ मार्च, २०२३ रोजी अपिलीय अधिकारी यांच्या आदेशात तसेच जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या दिशाभूल करणाऱ्या प्रतिसादाबाबत दिलेल्या तक्रारीवर प्रशासकीय पातळीवर पडताळणी करून योग्य ती कार्यवाही करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत. यातील अपिलीय अधिकाऱ्यांनी पारित केलेले आदेश रद्दबातल करीत यामध्ये असलेली सर्व माहिती तात्काळ व विनामूल्य प्रदान करण्यात यावी.

**आदेश**

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र. ६०५८ ते ६०६०/२०२६ निकाली काढण्यात येत आहेत.**

**स्वाक्षरीत/-**

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : १५-०७-२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**